# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** पठारी **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0175 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/04/2022 00:49 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 20/04/2022
**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 20/04/2022
**Time From (वेळेपासून):** 19:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:46 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 21/04/2022 **Time (वेळ):** 00:38 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/04/2022 00:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 01 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** हाटेल शबनम समोर रोडवर ,पाथरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सरताजखान सिराजखान पठाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा इंदीरा नगर,पाथरी,पठारी,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा इंदीरा नगर,पाथरी,पठारी,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-8177901010**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.मुस्तफा जलील सयद | | | 1. रा महाराष्ट्र बंके समोर, ,रा सातोना ता परतुर जि जालना ,जालना,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रू.दराच्या 06 चलनी नोटा | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 3,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद पो.स्टे.पाथरी दिनांक 20/04/2022 मी सरताजखान सिराजखान पठाण वय 27 वर्षे व्यवसाय मजुरी रा.इंदीरा नगर,पाथरी जि.परभणी मो.नं.8177901010 मी फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे राहणारा असून मी मजुरी करतो. मी मागील पाच महिण्यांपासुन मटका चालु केला होता. माझेकडे माझा मित्र अलीम शेख हा मटका खेळत होता. मागील दोन आठवडयांपासुन मटका बंद केला होता व सध्या कपडयांचा धंदा करत आहे. दि.16/04/2022 रोजी मी माझे कामानिमीत्त पुण्याला असताना पोलीस िशपाई सयद याने फोन करून माझा मित्र अलीम शेख यास पकडले असुन त्याचा मोबाईलमध्ये मी व अलीमने खेळलेल्या मटक्याचे आकडे मिळाले आहेत. त्यामुळे मी तुझेवर व तुझा मित्र अलीम शेखवर मटक्याचा गुन्हा दाखल करतो जर गुन्हा दाखल करण्याचा नसेल व पुढे मटका चालवु द्यायचा असेल तर पाच हजार रूपये आणुन दे नाहीतर अलीम शेखला आणि तुला अटक करतो. तेंव्हा मी सयद सरांना मी आल्यावर तुम्हाला पैसे देतो, माझेवर व अलीमवर गुन्हा दाखल करू नका मी मटक्याचा धंदा बंद केला आहे. दि.17/04/2022 ला मी सयद सरांना भेटलो असता ते कालच्या व्यवहार बरोबर कर असे म्हणुन पाच हजार रूपये मागणी केली. पोलीस िशपाई सयद सर पोलीस स्टेशन पाथरी यांना पैसे दिल नाही तर माझेवर व अलीम शेखवर खोटा गुन्हा दाखल करतील व मला त्रास देतील या भितीने मी त्यांना होकार देवुन आपणाकडे तक्रार देण्यासाठी आलो आहे. सयद सर याने स्वतः किंवा इतरांमार्फत लाचेची मागणी करुन लाच स्विकारल्यास त्यांचे विरुद्ध योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.सयद सर यांचेसोबत माझा कोणताही आर्थिक देवान घेवानीचा व्यवहार नाही किंवा त्यांचे सोबत माझी दुश्मनी नाही. मी माझे तक्रारीसोबत माझे आधार कार्डची झेरक्स व 5000/- रुपये जमा करत आहे.त्यावरून पोनि श्रीमती धुतराज यांनी दोन शासकीय पंच म्हणुन 1) श्री. भास्कर अशोकराव चोरमले वय 35 वर्शे व्यवसाय िशपाई, महावितरण,मंडळ कार्यालय,परभणी 2) श्री जावेदखान शेरखान पठाण वय 33 वर्षे व्यवसाय नि.लिपीक, महावितरण कार्यालय परभणी यांना पत्रक देवून बोलावून घेतले. दोन्ही पंचांची व माझी ओळख करून देण्यात आली. त्यानंतर पोनि श्रीमती धुतराज यांनी माझी हस्तलिखीत तक्रार पंचांना वाचण्यास दिली. दोन्ही पंचानी माझी तक्रार वाचून सदर तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर सदर पडताळणी/सापळा कार्यवाहीसाठी दि.18/04/2022 रोजी पाथरी येथे सर्व सापळा पथक व मी खाजगी वाहन क्रुझरने पाथरी येथे आलो. त्यानंतर करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान दि.18/04/2022 रोजी मी पंचायत समिती समोर,पाथरी येथे श्री.सयद, पोलीस कर्मचारी, पोलीस ठाणे पाथरी यांची माझे वर नमुद कामानिमीत्त भेट घेतली असता त्यांनी मला पंच क्र:1 यांचे समक्ष 3000/- रूपये लाचेची मागणी केली. सदर पडताळणी दरम्यानचे श्री.सयद, पोलीस कर्मचारी व माझ्यात पंच क्र.1 यांचे समक्ष झालेले संभाषण डिजिटल व्हाईस रेकर्डरच्या सहाय्याने मेमरीकार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. ते मेमरी कार्ड पोनि श्रीमती धुतराज



Scanned with CamScanner

यांनी ताब्यात घेतले आहे. तसा सविस्तर पडताळणी पंचनामा दि.18/04/2022 रोजी करण्यात आला आहे. त्यानंतर श्री.सयद, पोलीस कर्मचारी यांनी लाचेची रक्कम लगेच घेवून येण्यास सांगीतल्याने त्यांचे विरूध्द लगेच सापळा आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर श्री.सयद, पोलीस कर्मचारी यांनी मला 3000/- रूपये लाचेची मागणी केल्याने मी तक्रारी सोबत जमा केलेले 5000/- रू त्यापैकी सापळापुर्व कार्यवाही दरम्यान लाच म्हणून दयावयाचे 3000/- रू. ज्यात 500 रू दराच्या सहा नोटा समोर ठेवल्या. सदर नोटांचे क्रमांक पोह/धाग यांनी नोंद केले. अंथ्रसिन पावडर व अल्ट्राव्हाईलेट लंम्पचे गुणधर्म व वापरा बाबत पंच व मला माहिती देवून त्याबाबत पोह/धाग यांचेकडुन प्रात्यक्षीक करून दाखविण्यात आले. पोह/धाग यांनी लाचेची रक्कम 3000/- रू. ( 500/- रू.दराच्या 06 चलनी नोटा) नोटांना अंथ्रसिन पावडर लावून लाचेची रक्कम माझे शर्टच्या छातीवरील डाव्या बाजूच्या खिशा मध्ये ठेवुन दिली. लोकसेवक श्री.सयद, पोलीस कर्मचारी यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर सापळा पथकास दिसेल अशा रितीने माझे गळयातील रूमाल काढून तोंड पुसावे असे सांगुन लाच स्विकारल्या बाबत इशारा करण्याचे मला सांगीतले. त्यानंतर पोनि श्रीमती धुतराज यांनी मला, पंच व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत सुचना दिल्या. सापळा कार्यवाही दरम्यान मी पंच क्र.1 यांचेसह श्री.सयद, पोलीस कर्मचारी यांची भेट घेण्यासाठी माझे मोटार सायकलवर पंचायमत समिती पाथरी येथे निघालो आमचे पाठोपाठ पंच क्र.2 व सापळा पथक असे आमचे पाळतीवर होते. तेंव्हा माझी व श्री.सयद, पोलीस कर्मचारी यांची भेट झाली परंतु त्यांनी माझे कडुन लाचेची रक्कम स्विकारली नाही व ते तेथुन निघुन गेले. एकंदरीत सदर दिवशी श्री.सयद, पोलीस कर्मचारी यांनी माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारली नाही म्हणुन माझे व पोनि श्रीमती धुतराज यांचे मते लाचेचा सापळा पुन्हा आजमाविण्याचे ठरविण्यात आले. तसा दि. 18/04/2022 रोजीच सविस्तर सापळा पुर्व व सापळा स्थगीती पंचनामा पंचासमक्ष करण्यात आला. तसेच मला मी तक्रारी सोबत जमा केलेले 5000/- रू पैकी उर्वरीत 2000/- रू मला परत करण्यात आले आहेत. त्यानंतर आज दि.20/04/2022 रोजी मी पोनि श्रीमती धुतराज मडम यांना संपर्क केला व श्री.सयद,पोलीस कर्मचारी यांनी मला आज भेटण्यासाठी बोलावले असल्याबाबत सांगीतले. त्याप्रमाणे पोलीस उप अधिक्षक श्री.बिडवे,पोनि श्रीमती धुतराज, पोनि श्री.वाघमारे व सर्व सापळा पथक असे पाथरी येथे आलात. त्यानंतर श्री.सयद, पोलीस कर्मचारी यांनी मला 3000/- रूपये लाचेची मागणी केल्याने दि. 18/04/2022 रोजी अंथ्रसिन पावडर लावलेले लाचेची रक्कम माझे शर्टच्या छातीवरील डाव्या बाजूच्या खिशा मध्ये ठेवुन दिली. लोकसेवक श्री.सयद, पोलीस कर्मचारी यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर सापळा पथकास दिसेल अशा रितीने माझे शर्टचे दोन्ही हाताच्या बाहया वर करण्यास सांगुन लाच स्विकारल्या बाबत इशारा करण्याचे मला सांगीतले. दरम्यान मला श्री.सयद,पोलीस कर्मचारी यांचा फोन आला व त्यांनी मला हटेल शबनम पाथरी येथे भेटण्यास बोलावले. त्याप्रमाणे सापळा हटेल शबनम पाथरी येथे येथे आयोजीत करण्याचे ठरविण्यात आहे. त्यानंतर पोनि श्रीमती धुतराज यांनी मला, पंच व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत सुचना दिल्या. सापळा कार्यवाही दरम्यान मी पंच क्र.1 यांचेसह श्री.सयद, पोलीस कर्मचारी यांची भेट घेण्यासाठी माझे मोटार सायकलवर हटेल शबनम पाथरीकडे निघालो आमचे पाठोपाठ पंच क्र.2 व सापळा पथक असे आमचे पाळतीवर होते. दरम्यान माझी व श्री. सयद, पोलीस कर्मचारी यांची हटेल शबनम पाथरी येथे पंच क्र1 यांचे समक्ष भेट घेतली. तेथे आमचेमध्ये चर्चा झाली व दरम्यान त्यांनी माझेकडुन लाचेची रक्कम रू.3000/- स्विकारून त्यांचे शर्टचे डावे बाजुचे खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मी आपण सांगीतल्याप्रमाणे पुर्वनियोजीत ईशारा केला असता पोलीस उप अधिक्षक श्री.बिडवे,पोनि श्रीमती धुतराज, पोनि श्री.वाघमारे व सर्व सापळा पथकाने येवून श्री.सयद, पोलीस कर्मचारी यांना सेहाथ पकडले तेंव्हा सयद यांनी पळुन जाण्याचा प्रयत्न केला असता ते पडले त्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले. तेथेच हटेल शबनम मध्ये पुढील कार्यवाही केली. त्यानंतर श्री.सयद, पोलीस कर्मचारी यांना वाहनामध्ये बसून पुढील कार्यवाहीसाठी पो.स्टे.पाथरी येथे नेले. सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री.सयद, पोलीस कर्मचारी यांचेमध्ये झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकर्डरव्दारे मेमरीकार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे. सदर Sandisk 08 GB Micro SDHC मेमरी कार्ड जप्त करण्यात आले आहे. तसा सविस्तर सापळा पुर्व व सापळा पंचनामा पंचासमक्ष करण्यात आला आहे. तरी दि.18/02/2022 रोजी आरोपी लोकसेवक श्री.मुस्तफा जलील सयद वय 32 वर्ष व्यवसाय पोलीस शिपाई ब.नं.904 पोलीस ठाणे पाथरी जि.परभणी रा.महाराष्ट्र बंके समोर, सातोना ता.परतुर जि.जालना (वर्ग-3) यांनी मला माझे व माझा मित्रावर मटक्याचा गुन्हा दाखल न करणेसाठी व तक्रारदार यांना यापुढे मटका चालु देण्यासाठी 3000/-रूपये लाचेची मागणी पंच क्र.1 यांचे समक्ष करून सदर लाचेची रक्कम दि. 20/04/2022 रोजी 19.46 वा.हटेल शबनम समोर मदीना पानपटी समोर रोडवर पाथरी येथे पंच क्र.1 यांचे समक्ष स्विकारली आहे. म्हणुन माझी आरोपी लोकसेवक श्री.मुस्तफा जलील सयद वय 32 वर्ष व्यवसाय पोलीस शिपाई ब.नं.904 पोलीस ठाणे पाथरी जि.परभणी रा.महाराष्ट्र बंके समोर, सातोना ता.परतुर जि.जालना (वर्ग-3) यांचे विरूध्द कायदेशिर फिर्याद आहे. माझी फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली त्याची प्रिंट काढून मला वाचण्यास दिली असता ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** VASANT DEVRAO CHAVAN(I (Inspector)) / PBMAH79449 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Sukhraj

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

समक्ष
[signature]
HC/1452
पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे. पाथरी, जि.परभणी

[signature]

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): VASANT DEVRAO CHAVAN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMAH79449



Scanned with CamScanner